**<u>रे.दि.मु.नं.१६४/२००६ मधील नि.१४९ वरील आदेश</u>**
**(<u>आदेश दि.३०/०८/२०२२</u>).**

प्रस्तूतचा अर्ज हा प्रतिवादी याने दिनांक ०५.०८.२०१९ रोजी नि.क्र.१३३ वर झालेला “विना म्हणणे आदेश” मागे घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.५१ वर दाखल करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे व वैकल्पिकरित्या रूपये २,०००/– चा दंड आकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**२**. प्रतिवादीचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

**३**. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादीने कथन केलेले आहे की, सन २०२१ मध्ये प्रतिवादीने दुस–या विधीज्ञांची नेमणूक दाव्यात केलेली आहे. पुर्वीच्या विधीज्ञांशी कोणताही संपर्क होवू शकलेला नाही तर दरम्यानच्या काळात कोविडची परिस्थिती उद्भवल्यामुळे दाव्याचे कामकाज चालविता आलेले नाही. त्यामुळे, म्हणणे देण्यात झालेला ४ वर्षांचा उशीर हा जाणून–भूजुन झालेला नाही तो अनावधानाने झालेला आहे तरी, दिनांक ०५.०८.२०१९ रोजीचा आदेश मागे घेवून प्रतिवादीस म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्याची विनंती केली आहे.

**४**. वादीतर्फे विधीज्ञ यांनी त्यांचे लेखी म्हणण्यात नमुद केले आहे की, प्रतिवादीने उशीराचे कुठलेही संयुक्तीक कारण अर्जात नमुद केलेले नाही. प्रतिवादी वारंवार विधीज्ञ बदलून केवळ वादींना आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी व दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी उशीराने म्हणणे देत आहे ते कायद्याला अभिप्रेत

नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज रद्द करणेत यावा. प्रतिवादी हा पुर्णपणे निष्काळजी व हलगर्जी आहे. करिता, प्रस्तुतचा अर्ज रद्द व्हावा.

५. अर्जातील कथने व त्यावरील म्हणणे तसेच मुळ दावा आणि नि.क्र.१३३ वरील न्यायालयीन आयुक्त याच्या नेमणूकीचा अर्ज विचारात घेतला. वादीने नि.क्र.१३३ वर अर्ज दाखल करून तालूका निरीक्षक भुमी–अभिलेख यांच्या मार्फत दावा मिळकतीची मोजणी करून त्याचा अहवाल आयुक्त यांनी अभिलेखावर सादर करावा म्हणून विनंती केलेली आहे. मुळ दाव्याच्या निकालासाठी सदरचा अर्ज विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. प्रतिवादी याने म्हणणे देण्यास चार वर्षांचा विलंब केलेला आहे. कायद्याच्या गृहीतकाप्रमाणे कुठल्याही विलंब माफीसाठी तो विलंब का झाला याबाबत प्रत्येक दिवसाचा उशीराचा तपशील अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, प्रतिवादीने तशी कुठलीही तसदी घेतलेली नाही. त्यामुळे, प्रतिवादीचा सदरचा अर्ज हा विचारात घेतला जावू शकत नाही. परंतु, प्रतिवादीचा हा अर्ज नामंजूर केल्यास त्याला पुरेशी संधी मिळणार नाही. त्यावेळेस दाव्यास झालेला उशीर हा विचारात घेणे आवश्यक आहे.

६. वर कथन केल्याप्रमाणे, प्रतिवादीने दाखल केलेल्या सदरच्या अर्जात कुठलेही संयुक्तीक कारण नसल्याने तो रद्द होणस पात्र आहे. परंतु, प्रतिवादीस त्याचे म्हणणे दाखल करून दाव्याचा गुण–दोषांवर निकाल होणेसाठी त्यास संधी देणे आवश्यक वाटत आहे. परंतु, दाव्यास झालेल्या उशीरासाठी प्रतिवादी हा दंड भरण्यास बांधील आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. प्रतिवादीचा नि.क्र.१४९ वरील अर्ज सशर्त मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी दंडाची रक्कम रूपये १,०००/– (रूपये एक हजार फक्त) वादी यांना अदा करावी.

वाई.
दि.३०/०८/२०२२.

(एस. एस. निचळ)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,वाई